# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०४/२०१९
## दि.०४/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३५७/१९,भादविक ३२६,३२४,१४३,१४४,१४७,१४८,१४९,महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | शुभम दत्तुगोठे,वय-२१ वर्षे,रा.औंध गाव,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम,सर्व रा.कस्तुरबा वसाहत,औंध,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०४/१९ रोजी १५/०० वा. सत्यनारायण स्टोअर्स समोर,बस स्टॉप जवळ,औंध,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे साथीदार यांची नमुद इसमां बरोबर भांडणे चालु होती. सदरची भांडणे फिर्यादी यांनी मध्यस्थी करुन सोडविल्याचे कारणावरून,त्याचा राग मनात धरुन, यातील नमुद इसमांनी फिर्यादी हे नमुद ठिकाणी थांबलेले असताना, सदर इसमांनी त्यांचेकडे असलेल्या कोयत्याने फिर्यादीचे हातावर वार करुन,त्यांना गंभीर जखमी केले. तसेच प्लॅस्टिक पाईपने फिर्यादी यांचे उजवे पायावर मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.व्ही.दोडमिसे ९५०३७५८२८४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १२५/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४० वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | मोबाईलधारक व इस्टाग्राफधारकवरील अज्ञात इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुलै २०१८ पासुन माहे सप्टेंबर २०१८ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे रहाते घरी मोबाईलवरुन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईलधारक व इस्टाग्राफधारकवरील अज्ञात इसम व महिला यांनी फिर्यादी यांना वेळोवेळी फोनवरून व ई-मेलद्वारे त्यांचे बँकेचे खात्यांवरती गिफ्ट म्हणुन २५,०००/- युरो पाठविले आहेत असे सांगुन,त्यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांना वेळोवेळी सदर इसमांचे खात्यावर पैसे भरावयास लावून,फिर्यादीस कुठलेही गिफ्ट न देता,त्यांनी संगणकीय ऑनलाईन माध्यमाचा वापर करुन,फिर्यादी यांची एकुण १७,११,४०९/- रुपयेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) एस.एस.खटके ७५८८२३५८४४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २१६/१९,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-७५ वर्षे,रा.पुणे सातारा रोड पुणे |
| **आरोपी** | मोबाईलधारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०१/२०१९ रोजीपासुन ते दि.३०/०१/२०१९ रोजीपर्यंत सॅलिसबरी पार्क,पुणे येथील ऑफीस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे बॅंकऑफ महाराष्ट्र खडकी शाखा,पुणे येथील खात्या मध्ये पुरेशी रक्कम नसलेने त्यांचे पॉलिसीचे हप्त्य़ाचे इ.सी.एस. परत गेले. त्याबाबतचा इनश्युरन्स कंपनी कडून फिर्यादी यांचे मोबाईलवर मेसज प्राप्त झाला होता. यातील नमुद मोबाईलधारक इसमाने फिर्यादी यांना वारंवार फोन येवून,तो इनश्युरन्स कंपनीकडून बोलत असल्याचे सांगून तुमचे विम्याचे हप्त्याचे चेक आमचे कंपनीच्या माणसाकडे द्यावा असे वारंवार सांगत होते. त्यानुसार फिर्यादी यांनी त्यास त्यांचे सॅलिसबरी पार्क,पुणे येथील ऑफीस मध्ये बोलविले असता,सदर इसमाने फिर्यादी यांचे ऑफीस मध्ये आला व त्याने तो मॅक्स लाईफ इनश्युरन्स कंपनीकडुन विम्याचे हप्त्याचे रक्कमेचे चेक घेण्यास आलेबाबत सांगितले. |

त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास स्टेट बॅक ऑफ इंडिया,हिंजवडी शाखा,पुणे येथील त्यांचे बचत खाते नबराचे  खात्याचे एकुण चार चेक एम.एल.आय. सर्व्हिस या नावाने दिले होते. फिर्यादी यांना त्यांचे मेल आय.डी.वर पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये त्यांनी पुढील एक वर्षाचा आगाऊ प्रिमीअम भरल्यास त्यांना ३,६६,७५२ रूपये इतका फायदा होईल अशा संदर्भाचे पत्र पाठविले. फिर्यादी यांना शंका आल्याने त्यांनी प्राप्त मेल व पावत्या इन्शुरन्स ऑफीस मध्ये जावून खात्री केली असता,सर्व चारही पावत्या व पत्र हे बनावट असून,कंपनीने असे कोणतेही पत्र पाठविले नाही अगर असा कोणताही इसम हप्त्याच्या रक्कमेचा चेक घेणेसाठी फिर्यादी यांचे ऑफीसला पाठविला नाही. तरी सदर इसमाने फिर्यादी यांना तो इन्शुरन्स कंपनीचा प्रतिनीधी असल्याचे सांगून,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून,फिर्यादी यांचेकडून चार विमा पॉलीसीचे प्रिमीयम रक्कमेचे चार चेक ४,०९,००२/- रूपयाचे घेवुन जावुन ते वठवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.ए.शेंडगे ९७६३७११००७

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**